Estd. 1962
NAAC "A" Grade
MHRD-NIRF 28th Rank

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय :– नॅक /एन.बी.ए. मूल्यांकनाबाबत.**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचनेने व महाराष्ट्र शासनाने सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांनी नॅकचे मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन करून घेण्याबाबतच दिनांक 08 ऑक्टोबर 2010 रोजी आदेश निर्गमित करण्यात आले होते. सदरचे आदेश व त्याबाबतची आवश्यक माहिती विद्यापीठाकडून वेळोवेळी महाविद्यालयास कळविण्यात आलेली आहे. तसेच जा.क्र.शिवाजी विद्या./नॅक/01 दिनांकः– 02 एप्रिल 2016 रोजी नॅक मुल्यांकन/पुर्नमुल्यांकनाबाबतचे या कार्यालयाचे परिपत्रक सर्व महाविद्यालयांना पाठविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने, जी महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था नॅक/एन.बी.ए. मूल्यांकन/पुनर्मुल्यांकनास पात्र आहेत अशा महाविद्यालयांनी खालील बाबी अवलोकनी घेऊन आपल्या महाविद्यालयाचे मूल्यांकन/पुनर्मूल्यांकनाबाबत तात्काळ योग्य ती कार्यवाही करावी अन्यथा सदर महाविद्यालयांबाबत उपरोक्त नमूद शासन निर्णयानुसार असंलग्नीकरणाबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे.

1. सध्या 01 एप्रिल 2017 पासून नॅकमुल्यांकनाबाबतचे निकष बदलले असून जी महाविद्यालये नॅकला सामोरे जाणार आहेत त्यांनी नॅकचे संकेतस्थळावरील अद्यावत माहिती घेवून त्यानुसार नॅकचे कामकाज पूर्ण करावे.
2. विद्यापीठाकडे प्राप्त असलेल्या माहितीवरून बहुतांशी महाविद्यालयांचे पूर्वीचे नॅक/एन.बी.ए. मूल्यांकन करून पाच वर्षे पूर्ण झालेली आहेत अशा सर्व महाविद्यालयांनी नॅकचे पुर्नमुल्यांकनाबाबतची कार्यवाही तात्काळ करावी.
3. काही नवीन महाविद्यालयांना/मान्यताप्राप्त संस्थांना स्थापनेस पाच वर्षे अथवा त्याहीपेक्षा जास्त वर्षे होवून सुदधा तसेच मूल्यांकनास पात्र होऊनही अद्याप नॅक मूल्यांकनास सुरवात केलेचे दिसून येत नाही अशा महाविद्यालयांनी/मान्यताप्राप्त संस्थांनी नॅक/एन.बी.ए. मूल्यांकनाच्या प्रक्रियेस तात्काळ सुरूवात करावी.
4. विनाअनुदानित किंवा अनुदानित असे महाविद्यालयांनी वर्गीकरण न करता सर्वच संलग्न महाविद्यालयांना/मान्यताप्राप्त संस्थांना नॅक/एन.बी.ए. मूल्यांकन करून घेणे बंधनकारक आहे.
5. सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांनी नॅक, बेंगलोर यांना प्रतिवर्षी **IQAC** अंतर्गत **AQAR** सादर करावा लागतो सदरचा अहवाल नॅकच्या बदलत्या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करणेचा असून सदर अहवाल नॅक यांना सादर करून त्याच्या किमान 10 प्रती महाविद्यालयाकडे जतन करून ठेवण्यात याव्यात. याबाबत अधिक माहिती नॅकच्या *www.naac.org.in* या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
6. ज्या महाविद्यालयांनी नॅक, बेंगलोर यांना स्वयंअध्ययन अहवाल सादर केलेला आहे त्यांनी सदर अहवालाची एक प्रत विद्यापीठ कार्यालयाकडे पाठवून द्यावी.
7. विद्यापीठाने नॅकच्या तिस–या मुंल्याकनावेळी विद्यापीठाने स्वतंत्र आय.क्यु.ए.सी. डॉक्युमेंटेशन सेंटरची उभारणी केलेली असून महाविद्यालयास नॅकच्या भेटीदरम्यान आय.क्यु.ए.सी. बाबत काही मार्गदर्शन हवे असलेस विद्यापीठाच्या आय.क्यु.ए.सी. डॉक्युमेंटेशन सेंटरला आवश्य भेट द्यावी. सदर भेटीबाबत नॅक विभागास संपर्क (0231–2609087) साधून वेळ निश्चित करून घ्यावी.
8. ज्या महाविद्यालयांनी नॅकचे मुल्यांकन/पुर्नमुल्यांकन पूर्ण केले आहेत अशा महाविद्यालयांची विद्यापीठ कार्यालयाकडे प्राप्त झालेली माहिती विद्यापीठाच्या संकेत स्थळावर Internal Quality Assurance Cell यामध्ये NAAC Grade Status of Affiliated Colleges या शिर्षकाखाली ठेवण्यात आली आहे. सदर माहितीमध्ये काही दुरूस्ती असल्यास योग्यत्या कागदपत्रांसहित विहित नमुन्यामध्ये दि.15 एप्रिल 2017 पूर्वी विद्यापीठ कार्यालयास कळवावी.

आदेशावरून,

I/C उपकुलसचिव

जा.क्र.शिवाजी विद्या./आय.क्यु.ए.सी./डी.वाय./01
दिनांकः– 01 एप्रिल 2017
**सोबत : वरील प्रमाणे.**

**प्रति,**
**मा. प्राचार्य / संचालक,**
**सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.**